महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १६ /०२/२०२३

**परिपत्रक -**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.बीसीसी-११२२/प्र.क्र.१२८/१६-ब, दिनांक ३१.०१.२०२३.

**विषय :-**शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणाच्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गात अधिसंख्य पदे निर्माण करणे व त्यावर निवड प्राधिकरणांनी निवड व शिफारस केलेल्या उमेदवारांची नियुक्ती करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.बीसीसी-११२२/प्र.क्र.१२८/१६-ब, दि.३१.०१.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०१३११७१७५७३००७असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( विनय राणे )
वरिष्ठ कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / नियोजन व समन्वय / विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे /नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक,व्हीआयपी सुरक्षा, मुंबई /मोटार परिवहन विभाग, पुणे /नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

सर्व उच्चश्रेणी / निम्नश्रेणी लघुलेखक, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४



Scanned with CamScanner

शासनाच्या, शासकीय विभागांच्या आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांच्या किंवा प्राधिकरणाच्या नागरी सेवा व पदे यांच्या संवर्गात अधिसंख्य पदे निर्माण करणे व त्यावर निवड प्राधिकरणांनी निवड व शिफारस केलेल्या उमेदवारांची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी ११२२/प्र.क्र.१२८/१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी, २०२३.

वाचा:-

१) महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४५)
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी ११२२/ प्र.क्र.१२८/१६-ब, दि.२१.९.२०२२
३) महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) अधिनियम, २०२२

प्रस्तावना :

कोविड-१९ संसर्ग, जागतिक महामारी व लॉकडाऊन या कारणांमुळे कार्यालयीन उपस्थितीवर आणि वाहतुक व्यवस्थेवर शासनाने निर्बंध घातले होते. अत्यावश्यक सेवा वगळून शासकीय व खाजगी आस्थापना, शासकीय कार्यालये काही कालावधीसाठी बंद करण्यात आली होती. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि इतर निवड यंत्रणा यांच्याद्वारे विहित प्रक्रिया पूर्ण करून दि. ९.९.२०२० पूर्वी निवड झालेल्या/शिफारस झालेल्या उमेदवारांना प्रत्यक्षात नियुक्ती देण्यापूर्वी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना सेवेत नियुक्ती देणे/ रूजू करून घेणे शासनास शक्य झाले नाही. यामध्ये उमेदवारांची कोणतीही चूक नसतांना ते परिस्थितीचे बळी ठरून नियुक्तीपासून वंचित राहीले.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन, मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.९.९.२०२० रोजी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (एसईबीसी) आरक्षण अधिनियम, २०१८ ला अंतरिम रथगिती देण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, निवड मंडळे व पदभरती करणाऱ्या इतर यंत्रणा यांनी शासन सेवेतील नियुक्तीकरीता शिफारस केलेल्या परंतू दि.९.९.२०२० पूर्वी नियुक्ती न

Scanned with CamScanner

मिळालेल्या १०६४ उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ अन्वये महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२ (सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५) पारित करण्यात आलेला आहे.

तद्नंतर शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या अखत्यारीतील कार्यालयांकडून दि.९.९.२०२० पूर्वी विहित प्रक्रिया पूर्ण करून निवड झालेल्या आणखी ४८९ उमेदवारांचा तपशील प्राप्त झाला. महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२ (सन २०२२ चा अधिनियम क्र. ४५) अन्वये निर्माण करण्यात आलेल्या १०६४ अधिसंख्य पदांव्यतिरिक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोग, निवड मंडळे व पदभरती करणाऱ्या अन्य यंत्रणा यांनी शासन सेवेतील नियुक्तीकरिता दि. ९.९.२०२० पूर्वी शिफारस केलेल्या परंतू नियुक्ती न मिळू शकलेल्या ४८९ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबतचे सुधारणा विधेयक विधानमंडळाच्या सन २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दि.२२.१२.२०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. विधानमंडळाने सदर सुधारणा विधेयकास मान्यता दिल्यानंतर "महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) अधिनियम, २०२२" पारित करण्यात आला. सदर अधिनियमामध्ये यापूर्वीच्या "महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम २०२२" अन्वये निर्माण करण्यात आलेल्या १०६४ पदांचा समावेश आहे. त्यानुसार सदर अधिनियमान्वये यापूर्वीची १०६४ पदे व नव्याने निर्माण केलेली ४८९ पदे अशा एकूण १५५३ पदांचा समावेश असलेली अनुसूची दाखल करण्यात आली आहे.

"महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२" च्या कलम ४(४) नुसार ४८९ उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच सन २०२२ चा अधिनियम क्र. ४५ सोबत जोडलेल्या अनुसूचीतील १०६४ अधिसंख्य पदांपैकी ३ पदांच्या मुळ विभागात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) अधिनियम, २०२२ च्या अनुपालनाकरीता संबंधित प्रशासकीय विभाग व त्यांच्या



Scanned with CamScanner

अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये, प्राधिकरणे, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) अधिनियम, २०२२ अन्वये (मुळ अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीतील १०६४ पदांव्यतिरिक्त ४८९ पदांच्या संख्येइतकी अधिसंख्य पदे) निर्माण केलेल्या संवर्गनिहाय ४८९ अधिसंख्य पदांची यादी जोडपत्र-१ मध्ये सोबत जोडली आहे.

२) महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम, २०२२ च्या कलम ४(३) अनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी संबंधित उमेदवारांना सेवेत रुजू होण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात ३० दिवसात उपस्थित रहाण्याबाबत लेखी पत्राद्वारे/ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे तात्काळ कळवावे.

३) अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात येत असलेल्या उमेदवारांनी त्यांना नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून लेखी/ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे कळविण्यात आल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात ३० दिवसांत उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

४) अधिसंख्य पदावर नियुक्ती द्यावयाच्या उमेदवारांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समिती, शासनासाठी, शासकीय विभागांसाठी आणि त्यांच्या दुय्यम कार्यालयांसाठी किंवा प्राधिकरणांसाठी उमेदवारांची निवड करण्यास सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत निवड/ शिफारस झाली असल्याची खात्री नियुक्ती प्राधिकाऱ्याने करावी.

५) अधिसंख्य पदावर नियुक्ती करताना, संबंधित उमेदवारांची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास घटक (EWS), शैक्षणिक व समाजिकदृष्ट्या मागास वर्ग (ESBC) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (SEBC) अथवा अराखीव यापैकी कोणत्याही एका प्रवर्गातून लोकसेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करण्यासाठी दि.९.९.२०२० पूर्वी शिफारस/ निवड करण्यात आली/ निवड प्रक्रिया पूर्ण झाली होती, याची नियुक्ती प्राधिकाऱ्याने आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खातरजमा करावी व खातरजमा झाल्यानंतरच संबंधित उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात यावी.



Scanned with CamScanner

६) दि.९.९.२०२० नंतर निवड झालेले/ शिफारस केलेले उमेदवार कोणत्याही परिस्थितीत अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यास पात्र होणार नाहीत, त्यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्याने अशा उमेदवारांना (दि.९.९.२०२० नंतरच्या निवड/ शिफारस झालेल्या) अधिसंख्य पदावर नियुक्ती देऊ नये.

७) मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात यावी.

८) अधिसंख्य पदावर उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भात कोणतीही अनियमितता झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची/नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहील.

९) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.३६०/१६-ब, दि.१५.७.२०२१ नुसार निवड याद्या सुधारीत झाल्यामुळे ज्या उमेदवारांना दि.९.९.२०२० पूर्वी शिफारस/ निवड केलेल्या मूळ पदाऐवजी अन्य पदावर नियुक्ती मिळाली आहे, अशा उमेदवारांना दि.९.९.२०२० पूर्वी त्यांची ज्या पदावर शिफारस/ निवड झाली होती त्या पदावर परंतू सद्यस्थितीत महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) अधिनियम, २०२२ द्वारे तयार करण्यात आलेल्या अधिसंख्य पदावर नियुक्ती मिळण्याचा पर्याय उपलब्ध राहील. मात्र, अशा उमेदवारांना प्रथम सध्या कार्यरत असलेल्या पदावरून कार्यमुक्त करणे आवश्यक राहील.

तसेच दि. १५.०७.२०२१ च्या शासन निर्णयानुसार, निवड याद्या सुधारीत झाल्यामुळे ज्या उमेदवारांना सुधारीत निवडयादीत स्थान मिळाले नाही, अशा दि. ९.९.२०२० पूर्वी शिफारस/निवड झालेल्या उमेदवारांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

१०) जोडपत्र-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ३ अधिसंख्य पदांवर संबंधित पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.



Scanned with CamScanner

२. सदर अधिनियमान्वये अधिसंख्य पदांवर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे वेतन व भत्ते नियमित पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली अदा करण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून अदा करण्यात यावेत.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२३०१३११७१७५७३००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARCHANA J TAMORE

Digitally signed by ARCHANA J TAMORE
DN: CN = ARCHANA J TAMORE C = IN S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2023.01.31 18 47 12 +05'30'

( अर्चना तामोरे )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
५. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
६. विरोधी पक्षनेता,विधानसभा
७. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
११.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
१४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,



Scanned with CamScanner

१८.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१९.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
२०.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१.प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
२२.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२३.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२४.सचिव,राज्य माहिती आयोग,
२५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२६. निवड नस्ती १६-ब.



Scanned with CamScanner

## जोडपत्र-१

| अ.क्र. (१) | विभागाचे नाव (२) | संवर्ग (३) | सुधारणा अधिनियमान्वये निर्माण केलेली पदे (४) |
|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग | कक्ष अधिकारी | ५ |
| २ | महसूल व वन विभाग | तहसिलदार | ८ |
| | | उप अधिक्षक | २ |
| | | नायब तहसिलदार | १२ |
| | | वनरक्षक | ५ |
| | | लिपिक | २ |
| | | तलाठी | २५ |
| | | पदसमूह ४ | १२ |
| | | शिपाई | ११ |
| | | रखवालदार | १ |
| ३ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग | कृषि सहायक | ५८ |
| ४ | वित्त विभाग | राज्य कर सहायक आयुक्त | ४ |
| | | लेखा लिपिक | २ |
| | | कनिष्ठ परिक्षक/ कनिष्ठ लेखा परिक्षक/ JUNIOR AUDITOR | १ |
| | | कर सहायक | ८ |
| ५ | ग्राम विकास विभाग | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी | ७ |
| | | सहायक गट विकास अधिकारी | ५ |
| | | ग्राम सेवक | १ |
| | | कंत्राटी ग्रामसेवक | ५ |
| | | आरोग्य सेवक (स्त्री) | १६ |
| | | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १२ |
| | | कनिष्ठ अभियंता स्थापत्य (सिंचन) | १ |
| | | पशुधन पर्यवेक्षक | २ |
| | | कनिष्ठ सहायक (लेखा) | १ |
| | | औषधनिर्माता/औषध निर्माण अधिकारी/ PHARMACIST | ३ |
| | | कनिष्ठ सहाय्यक (मंत्रा) | १ |
| | | विस्तार अधिकारी (कृषि) | १ |
| | | पर्यवेक्षिका महिला | १ |
| | | परिचर | २३ |
| ६ | नगर विकास विभाग | सहयोगी प्राध्यापक (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र) | १ |
| | | सहायक प्राध्यापक (भूलशास्त्र) | १ |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-ब) /सहायक अभियंता (स्थापत्य) (गट-ब) | १ |
| | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | उप अभियंता | ४ |
| | | सहायक | ३ |
| | महावितरण | अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १ |
| | | अतिरिक्त कार्यकारी अभियंता (वितरण) | २ |
| | | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | २ |
| | | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १ |
| | | विद्युत सहायक | १९१ |
| | | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण) | ३ |
| | | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (स्थापत्य) | १ |
| | | उपकेंद्र सहाय्यक | २२ |
| ८ | आदिवासी विकास विभाग | सहायक प्रकल्प अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी/ संशोधन अधिकारी/ गृह प्रमुख/ प्रबंधक | ४ |
| ९ | सार्वजनिक बांधकाम विभाग | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | २ |
| | | वाहन चालक | १ |
| १० | गृह विभाग | पोलीस उपं अधिक्षक/ सहायक आयुक्त | ११ |
| | | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | २ |
| ११ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | वरिष्ठ लिपिक | १ |
| | | **एकूण** | ४८९ |

ARCHANA J TAMORE

Digitally signed by ARCHANA J TAMORE
DN: CN = ARCHANA J TAMORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2023.01.31 18:47:30 +05'30'

(अर्चना तामोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

## जोडपत्र-२

यापूर्वीच्या महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मीती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम २०२२ अन्वये निर्माण केलेल्या १०६४ अधिसंख्य पदांपैकी संबंधित विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार खालील प्रमाणे ३ अधिसंख्य पदांकरीता यापुर्वी दर्शविलेल्या विभागांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मूळ अधिनियमानुसार पदाचे/ संवर्गाचे नाव व गट | बदल करावयाचा गट | पदसंख्या | मूळ अधिनियमात नमूद केलेला विभाग | सुधारणा अधिनियमानुसार विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ सहायक (लेखा) -गट-ब | गट-क | १ | वित्त विभाग | ग्राम विकास विभाग |
| २ | पशुधन पर्यवेक्षक गट-क | गट-क | १ | कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग | ग्राम विकास विभाग |
| ३ | औषध निर्माण अधिकारी गट-ब | गट-क | १ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग/ जिल्हा परिषद | ग्राम विकास विभाग |

ARCHANA J TAMORE

Digitally signed by ARCHANA J TAMORE
DN: CN = ARCHANA J TAMORE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Date: 2023.01.31 18:47:47 +05'30'

(अर्चना तामोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner